हुतात्मा स्मारके
देखभाल व परिरक्षा समिती

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:पीओएस/हुस्माक/१०९०/स्वासैकक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जून १९९०

वाचा:- १] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-हुस्माक-१०८३/१२३, दिनांक २०. ७. ८३.
२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-हुस्माक-१०८३/१२३, दिनांक २६. ९. ८३.

**शासन निर्णय :-**

राज्यात उभारण्यात आलेल्या हुतात्मा स्मारकांची देखभाल व परिरक्षा चांगल्या प्रकारे होण्यासाठी व त्याचे पावित्र्य राखण्यासाठी प्रत्येक हुतात्मा स्मारकासाठी, हुतात्मा स्मारक देखभाल व परिरक्षा समिती नेमण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार प्रत्येक हुतात्मा स्मारकासाठी देखभाल व परिरक्षा समिती नेमण्यास आता मान्यता देण्यात येत आहे. या समितीची रचना व कार्य खालीलप्रमाणे राहिल.

रचना - अध्यक्ष - जेष्ठ स्थानिक स्वातंत्र्य सैनिक
सदस्य - दोन स्थानिक स्वातंत्र्य सैनिक
सदस्य - स्थानिक लोक प्रतिनिधी
सदस्य - मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद/नगरपरिषदा.
सदस्य - वैद्यकिय अधिकारी.
सदस्य - उपशिक्षणाधिकारी
सदस्य - कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग

15 JUN 1990

समितीचे अध्यक्ष व सदस्य म्हणून इतर दोन स्वातंत्र्य सैनिक यांची नियुक्ती शासनामार्फत नंतर करण्यात येईल. इतर शासकीय सदस्य त्या त्या विभागाचे पदाधिकारी असतील.

२. प्रत्येक हुतात्मा स्मारक समितीने प्रामुख्याने खालील कर्तव्ये व कार्ये पहावीत की ज्यामुळे हुतात्मा स्मारकाची देखभाल व परिरक्षण चांगल्याप्रकारे होईल.

समितीची कार्ये व जबाबदाऱ्या

१] शासनातर्फे मिळणाऱ्या अनुदानाचा योग्य प्रकारे वापर केला जावा.

२) हुतात्मा स्मारकास दिवाबत्तीची व्यवस्था नियमित करावी.

३) हुतात्मा स्मारकाचे वास्तुचे परिरक्षण चांगल्याप्रकारे ठेवावे. वेळोवेळी रंगरंगोटी करावी.

४) हुतात्मा स्मारकात चालणारे उपक्रम उदा. बालवाडी, वाचनालय, वैद्यकीय मदत इत्यादि उपक्रम चांगल्या प्रकारे चालतील असे पहावे. ज्या ठिकाणी असे उपक्रम नसतील त्या ठिकाणी ते सुरू करण्यात यावेत.

५) हुतात्मा स्मारकांचा परिसर सुशोभित करण्यात यावा व त्याची निगा ठेवली जावी.

६) हुतात्मा स्मारकाचे मांगल्य राखले जावे.

७) हुतात्मा स्मारकात शासनाच्या परवानगीने समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात यावेत.

८) हुतात्मा स्मारकांच्या परिरक्षणाबाबत काही अडचणी असल्यास जिल्हाधिकारी अथवा शासनाच्या निदर्शनास आणाव्यात.

९) हुतात्मा स्मारकामध्ये स्वातंत्र्य चळवळीची स्थानिक माहिती ठेवणे तसेच स्वातंत्र्य संग्राम संबंधी छायाचित्र लावणे.

१०) वेळोवेळी राष्ट्रीय एकात्मतेसाठी स्वातंत्र्य सैनिकांचे व इतर नागरिकांचे मेळावे आयोजित करणे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ठ. आ. काकड)

ठ. आ. काकड

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी अग्रेषित.

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
राज्यमंत्री, सामान्य प्रशासन विभाग यांचे खाजगी सचिव,
सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई-३२,
सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई-३२,
सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,